# 20. राज्य विधीमंडळ
## भाग VI कलम 168 ते 212

- स्वीकृती - इंग्लंड
- राज्यघटनेतील भाग 168 ते 212 दरम्यान राज्यविधीमंडळाची तरतुद करण्यात आलेली असून राज्य विधीमंडळाचे संघटन, रचना, कालावधी व इतर अधिकार यांची तरतूद करण्यात आली आहे.
- **कलम 168 -** राज्यविधीमंडळ राज्यपाल, विधानसभा व विधानपरिषद यांनी मिळून बनलेले असेल. भारतात सध्या 22 घटकराज्यात एकगृही विधीमंडळ आहे तर 6 राज्यात विधानपरिषद असलेले द्विगृही विधीमंडळ आहे. (तेलंगणा, ओडिसा, बिहार, कर्नाटक, महाराष्ट्र, उत्तरप्रदेश)
- **कलम 169 -** राज्यातील विधानपरिषद नष्ट करणे किंवा विधानपरिषद नसलेल्या राज्यात विधानपरिषद निर्माण करण्यासाठीची तरतुद. विधानपरिषद असावी का नसावी हा ठरविण्याचा अधिकार त्या राज्याच्या विधानसभेला असून विधानसभेने तशा आशयाचा ठराव दोन तृतीयांश बहुमताने मंजुर केल्यावर संसद कायद्याद्वारे त्या राज्यात विधानपरिषद स्थापन करते.
- **कलम 170 -** विधानसभेच्या रचनेच्या संबंधी तरतुदी. राज्य विधानसभेमध्ये राज्यातील जनतेने सार्वत्रिक प्रौढ मतदान पद्धतीद्वारे विधानसभा सदस्यांची निवड केलेली असते. घटनेने महत्तम 500 तर किमान 60 इतकी संख्या निश्चित केलेली असून काही राज्यात ती 32/40 इतकी करण्यात आली आहे.
- **कलम 171 -** विधान परिषदेची संरचना.
- **कलम 171(1) -** विधानपरिषदेची सदस्य संख्या त्या राज्यातील विधानसभेच्या सदस्यसंख्येच्या 1/3 किंवा 40 पेक्षा कमी असणार नाही.
- **कलम 171(3) -** विधानपरिषदेवर निवडुन द्यावयाचे सदस्य.

| | | |
|---|---|---|
| विधानसभा सदस्याद्वारे | - | 1/3 किंवा 26 |
| स्थानिक स्वराज्य संस्था | - | 1/3 किंवा 26 |
| पदवीधर मतदार संघ | - | 1/12 किंवा 7 |
| शिक्षक मतदार संघ | - | 1/12 किंवा 7 |
| राज्यपालाद्वारे नामनिर्देशित | - | 1/6 किंवा 12 |

विधानपरिषदेच्या एकूण सदस्यापैकी 5/6 सदस्य अप्रत्यक्षपणे निवडुण दिले जातात तर उरलेले 1/6 सदस्य राज्यपालाद्वारे.

- **कलम 172 -** राज्यविधिमंडळाचा कार्यकाळ.

**विधानपरिषद -** हे राज्यविधीमंडळाचे कायस्वरुपी स्थायी सभागृह असले तरीही दर दोन वर्षांनी 1/3 सदस्य निवृत्त होतात व तेवढेच निवडुन येतात. अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य 6 वर्षे पदावर राहतात.

**विधानसभा -** विधानसभा सभागृहाचा कार्यकाल बैठकीच्या पहिल्या तारखेपासून 5 वर्षाचा असतो. आणिबाणीच्या काळात 1 वर्षाने वाढवता येतो किंवा तत्पुर्वी राज्यपाल मुख्यमंत्र्याच्या सल्ल्याने विधानसभा बरखास्त करतात.

- **कलम 173 -** राज्यविधिमंडळाच्या सदस्यत्वाचे पात्रता निकष. तो भारताचा नागरिक असावा. विधानपरिषदेसाठी 30 वर्षे तर विधानसभेसाठी 25 वर्षे पूर्ण केलेली असावीत. संसद ठरविल त्या कायद्याची पुर्तता करणे.
- **कलम 174 -** राज्यविधिमंडळाचे अधिवेशने, बरखास्ती, विसर्जन. राज्यपाल योग्य वेळी व ठिकाणी राज्यविधिमंडळाच्या सभागृहाचे अधिवेशन मुख्यमंत्र्याच्या सल्ल्याने बोलावतात. 1 वर्षात किमान 2 व कमाल 3 अधिवेशने होत असून 2 अधिवेशनामधला अंतर 6 महिन्यापेक्षा अधिक नसावा.
- **कलम 175 -** गृहांना संबोधित करण्याचा आणि निरोप पाठविण्याचा राज्यपालाचा अधिकार.

राज्यपाल विधानसभेच्या नवीन अधिवेशनासमोर किंवा प्रत्येक वर्षी पहिल्या अधिवेशनासमोर अभिभाषण करतात ते अभिभाषण तयार करुन निमंत्रण महाधिवक्ता देतो.

- **कलम 176 -** राज्यपालाचे विशेष अभिभाषण. प्रत्येक वर्षी पहिल्या अधिवेशनासमोर किंवा नवीन विधानसभा सभागृहासमोर अभिभाषण करतात ते अभिभाषण तयार करुन निमंत्रण महाधिवक्ता देतो.
- **कलम 177 -** राज्यविधिमंडळ गृहासंदर्भात मंत्र्याचे व महाधिवक्त्याचे अधिकार.

राज्यविधिमंडळामध्ये मंत्री व महाधिवक्ता दोन्ही सभागृहात उपस्थित राहतात. कामकाजात भाग घेतात. चर्चेत सहभागी होतात. मंत्री ज्या सभागृहाचे सदस्य आहेत त्या सभागृहात मतदान करतात. परंतु महाधिवक्ता मतदान करु शकत नाहीत.

- **कलम 178 -** विधानसभेचे सभापती व उपसभापती यांची तरतुद. विधानसभेचे निवडून आलेले सदस्य आपल्यामधूनच एकाची सभापती आणि उपसभापती म्हणुन निवड करतात. या बैठकीचे अध्यक्ष हंगामी सभापती असतात.
- **कलम 179 -** विधानसभेचे सभापती व उपसभापती ही पदे रिक्त होणे, त्यांचे राजीनामे आणि त्यांची पदच्युती. सभापती उपसभापतीकडे व उपसभापती सभापतीकडे राजीनामा देऊन पदमुक्त होतात.
- **कलम 180 -** सभापती पदाचे काम करण्याचा किंवा सभापती म्हणून काम करण्याचा उपसभापती किंवा इतर व्यक्तींचा अधिकार. सभापतीच्या अनुपस्थितीमध्ये उपसभापती सभापती म्हणुन कार्य करतो.

- **कलम 181 -** त्यांच्या पदच्युतीचा ठराव विचाराधीन असताना सभापती किंवा उपसभापती अध्यक्षस्थानी असणार नाहीत. सभापती उपसभापतीला पदावरुन दूर करण्याच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी ते असणार नाहीत परंतु मतदानात सहभागी असतात.
- **कलम 182 -** विधानपरिषदेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष. विधानपरिषद सदस्य आपल्या मधूनच एकाची अध्यक्ष व उपाध्यक्ष म्हणुन निवड करतात. दोन्ही पदाच्या पात्रतेसंबंधी कोणतीही तरतुद नाही.
- **कलम 183 -** अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांची पदे रिक्त होणे, त्यांचा राजीनामा आणि त्यांची पदच्युती. विधानपरिषदेचे सदस्य व उपाध्यक्ष अध्यक्षाकडे तर अध्यक्ष उपाध्यक्षाकडे राजीनामा देऊन पदमुक्त होतात किंवा त्यांना 14 दिवस अगोदर पूर्वसुचना देऊन सभागृहातील विशेष बहुमत ठरावाद्वारे पदावरुन दूर करता येते.
- **कलम 184 -** अध्यक्षपदी काम करण्याचा किंवा अध्यक्षाचे काम करण्याचा उपाध्यक्ष किंवा इतर व्यक्तीचा अधिकार. विधानपरिषदेचे अध्यक्ष अनुपस्थित असतील तर उपाध्यक्ष अध्यक्ष म्हणुन कार्य करतो.
- **कलम 185 -** त्यांच्या पदच्युतीचा ठराव विचाराधीन असताना, अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष अध्यक्षस्थानी असणार नाहीत. विधानपरिषदेचे अध्यक्ष उपाध्यक्ष यांना पदावरुन करण्याच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी दोघेही असणार नाहीत. परंतु उपस्थित राहून मतदानात सहभागी होतील.
- **कलम 186 -** सभापती व उपसभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन आणि भत्ते.
- **कलम 187 -** राज्य विधिमंडळाचे सचिवालय. राज्याच्या विधिमंडळाच्या सभागृहाला स्वतंत्र सचिवालय व कर्मचारी वर्ग असतो.
- **कलम 188 -** सदस्यांची शपथ किंवा प्रतिज्ञा.

| | | |
|---|---|---|
| विधानसभा सदस्य | - | हंगामी सभापती |
| विधानसभा उपसभापती | - | सभापती |
| विधानसभा सभापती | - | राज्यपाल |
| विधानपरिषद सदस्य | - | अध्यक्ष |
| विधानपरिषद उपाध्यक्ष | - | अध्यक्ष |
| विधापरिषद अध्यक्ष | - | राज्यपाल |

- **कलम 189 -** गृहामध्ये मतदान, गणपूर्ती नसताना किंवा रिक्त पदे असताना कृती करण्याचा गृहांचा अधिकार. राज्यविधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात समान मते पडल्यास सभागृहाचे सभापती निर्णायक मत देतात.

| | | |
|---|---|---|
| विधानसभा गणसंख्या | - | 1/10 किंवा 29 (अध्यक्षासह) |
| विधानपरिषद गणसंख्या | - | 1/10 किंवा 10 (अध्यक्षासह) |

- **कलम 190 -** जागा रिक्त होणे.
- **कलम 191 -** सदस्यत्वाच्या अपात्रतेचे निकष.
  तो मनोरुग्ण किंवा दिवाळखोर नसावा.
  शासकीय पदाचा लाभ घेणारा नसावा.
  भारतीय नागरिकत्वाचा त्याग केलेला नसावा.
- **कलम 192 -** सदस्यांच्या अपात्रतेबाबतच्या प्रश्नांवर निर्णय. राज्यविधिमंडळाच्या सदनाचा एखादा सदस्य पात्र किंवा अपात्र ठरविण्याचा अधिकार राज्यपालास असतो.
- **कलम 193 -** कलम 188 नुसार शपथ किंवा प्रतिज्ञा घेण्यापूर्वी किंवा पात्र नसताना किंवा अपात्र असताना बैठकीला उपस्थित राहणे आणि मतदान करणे याबाबत दंड. राज्यविधिमंडळाचा निवडुण आलेला सदस्य शपथ घेण्यापूर्वी किंवा पदावरुन दूर केल्यानंतर उपस्थित रहात असेल तर किंवा मतदानात भाग घेऊन मतदान केल्यास त्यास प्रतिदिन 500 रु. दंड आकारण्यात येतो. तर दुसऱ्या सभागृहात उपस्थित राहिल्यास 5000 रु. दंड आकारण्यात येतो.
- **कलम 194 -** विधिमंडळाची गृहे आणि सदस्य व समित्या यांचे अधिकार, विशेषाधिकार इत्यादी.
- **कलम 195 -** सदस्यांचे वेतन व भत्ते. सध्या राज्यविधिमंडळाच्या सदस्यांना 1.5 लाख प्रतिमहा पगार असून विशेष भत्तेही दिले जातात त्याचबरोबर 50 हजार निवृत्ती वेतनही दिले जाते. मतदार संघ विकासासाठी दरवर्षी 3 कोटी रुपये दिले जातात.
- **कलम 196 -** विधेयके सादर करणे आणि संमत करणे याबाबतच्या तरतुदी.
- **कलम 197 -** अर्थ विधेयक सोडून इतर विधेयकांच्या बाबतीत विधानपरिषदेच्या अधिकारांवर मर्यादा
- **कलम 198 -** अर्थ विधेयकाबाबत विशेष पद्धती.
- **कलम 199 -** अर्थ विधेयकाची व्याख्या.
- **कलम 200 -** विधेयकांना मान्यता. राज्यविधिमंडळाने मंजूर करुन पाठविलेल्या विधेयकास राज्यपाल संमती देऊ शकतात, संमती रोखून ठेवू शकतात. विधेयक विधानमंडळाकडे पुर्नविचारार्थ पाठवू शकतात किंवा राष्ट्रपतींच्या विचारार्थ रोखून ठेवू शकतात.
- **कलम 201 -** विचारार्थ विधेयक राखून ठेवणे.
- **कलम 202 -** वार्षिक वित्तीय पत्रक.
- **कलम 203 -** अंदाजांच्या संदर्भात विधिमंडळाची कार्यपद्धती.
- **कलम 204 -** विनियोग विधेयक.
- **कलम 205 -** पूरक, अतिरिक्त अधिक अनुदान.
- **कलम 206 -** लेखानुदान, पत मतदान आणि अपवादात्मक अनुदान
- **कलम 207 -** वित्तीय विधेयकांबाबत विशेष तरतुदी.
- **कलम 208 -** कार्यपद्धतीचे नियम.
- **कलम 209 -** वित्तीय कामकाजाच्या बाबतीत राज्य विधिमंडळातील कार्य पद्धतीचे कायद्यान्वये नियमन.
- **कलम 210 -** विधिमंडळातील कामकाजाची भाषा. राज्य विधिमंडळाचे कामकाज राज्यभाषेतून (मराठी) अथवा हिंदी किंवा

इंग्रजीतून चालते. इंग्रजी भाषेचा वापर 15 वर्षानंतर संपुष्टात आणण्याचा अधिकार राज्यविधिमंडळाला देण्यात आला असला तरीही आजही कामकाज इंग्रजीमधून चालते. इंग्रजी भाषेचा वापर 25 वर्षांसाठी हिमाचल प्रदेश, मणिपूर, मेघालय, त्रिपुरा यांनी चालू ठेवला तर 40 वर्षांसाठी अरुणाचल प्रदेश, गोवा, मिझोराम यांनी चालू ठेवला.

- **कलम 211 -** विधिमंडळातील चर्चेवरील मर्यादा.
- **कलम 212 -** विधिमंडळातील कामकाजाबाबत न्यायालये चौकशी करणार नाहीत.

**विधानसभा**

- भारतात सध्या 22 राज्य व 3 केंद्रशासित प्रदेशात विधानसभा असणारे एकगृही कायदेमंडळ अस्तित्वात आहेत.
- 1935 च्या कायद्यानुसार जुलै 1937 मध्ये महाराष्ट्रात 175 सदस्यसंख्या असलेली विधानसभा अस्तित्वात आली तिचे पहिले अधिवेशन 19 जुलै, 1937 रोजी पुणे येथील कौन्सिल हॉलमध्ये भरले. 1 मे, 1960 पासुन महाराष्ट्रात आतापर्यंत 14 विधानसभेच्या निवडणुका झाल्या. त्या पुढीलप्रमाणे -
  1960, 1962, 1967, 1972, 1978, 1980, 1985, 1990, 1995, 1999, 2004, 2009, 2014, 2019
- सध्याची 14 वी विधानसभा 2019 ते 2024.
  सभापती - राहुल नार्वेकर
  उपसभापती - नरहरी झिरवाळ
  विरोधी पक्षनेते - अजित पवार
  सभागृह नेते - एकनाथ शिंदे
  सचिव - राजेंद्र भगत
- महाराष्ट्र विधानसभा व विधानपरिषद या दोन सभगृहाला 1987 साली 50 वर्षे पूर्ण झाल्यामुळे 1988 या वर्षी राज्यविधिमंडळाचा सुवर्णमहोत्सव साजरा करण्यात आला. 2011 मध्ये अमृत महोत्सव साजरा करण्यात आला.

**भारतातील राज्यनिहाय विधानसभा सदस्य संख्या**

| क्र. | राज्याची नावे | विधानसभा सदस्य संख्या |
|---|---|---|
| 01. | सिक्कीम | 32 |
| 02. | गोवा | 40 |
| 03. | मिझोराम | 40 |
| 04. | अरुणाचलप्रदेश | 60 |
| 05. | मणिपूर | 60 |
| 06. | मेघालय | 60 |
| 07. | नागालँड | 60 |
| 08. | त्रिपुरा | 60 |
| 09. | हिमाचल प्रदेश | 68 |
| 10. | उत्तराखंड | 70 |
| 11. | झारखंड | 81 |
| 12. | छत्तीसगढ | 90 |
| 13. | हरियाणा | 90 |
| 14. | पंजाब | 117 |
| 15. | तेलंगणा | 119 |
| 16. | आसाम | 126 |
| 17. | केरळ | 140 |
| 18. | ओडिशा | 147 |
| 19. | आंध्रप्रदेश | 175 |
| 20. | गुजरात | 182 |
| 21. | राजस्थान | 200 |
| 22. | कर्नाटक | 224 |
| 23. | मध्यप्रदेश | 230 |
| 24. | तामिळनाडू | 234 |
| 25. | बिहार | 243 |
| 26. | महाराष्ट्र | 288 |
| 27. | पश्चिम बंगाल | 294 |
| 28. | उत्तरप्रदेश | 403 |

## महाराष्ट्रातील विधानसभा अध्यक्ष – १९६०–२०२३

| क्र. | अध्यक्षाची नावे | कालावधी |
|---|---|---|
| 01. | एस.एल. सिलम | 1960-1962 |
| 02. | बाळासाहेब भारंदे | 1962-1967 |
| 03. | बाळासाहेब भारंदे | 1967-1972 |
| 04. | शेषेराव वानखेडे | 1972-1977 |
| 05. | बाळासाहेब देसाई | 1977-1978 |
| 06. | शिवराज पाटील | 1978-1980 |
| 07. | प्राणलाल व्होरा | 1980-1980 |
| 08. | शरद दिघे | 1980-1985 |
| 09. | शंकरराव जगताप | 1985-1990 |
| 10. | मधुकर चौधरी | 1990-1995 |

| क्र. | अध्यक्षाची नावे | कालावधी |
|---|---|---|
| 11. | दत्ताजी नलवाडे | 1995-1999 |
| 12. | अरुण गुजराथी | 1999-2004 |
| 13. | बाबासाहेब कुपेकर | 2004-2009 |
| 14. | दिलीप वळसे-पाटील | 2009-2014 |
| 15. | हरिभाऊ बागडे | 2014-2019 |
| 16. | नाना पटोले | डिसें. 2019 ते फेब्रु.2021 |
| 17. | राहुल नार्वेकर | 3 जुलै 2022 ते आजपर्यंत |
| 18. | | |

### विधानपरिषद

- राज्यविधीमंडळाचे वरिष्ठ पण अधिकाराने कनिष्ठ सभागृह म्हणून ओळखले जाते.
- विधानपरिषद हे स्थायी व कायमस्वरुपी सभागृह म्हणुन ओळखले जाते.
- भारतात सध्या 6 राज्यात विधानपरिषद असणारे द्विगृही कायदेमंडळ अस्तित्वात आहे. (तेलंगणा, ओडिसा, कर्नाटक, बिहार, महाराष्ट्र, उत्तरप्रदेश)
- 1935 च्या कायद्यानुसार 20 जुलै, 1937 रोजी महाराष्ट्रात कौन्सिल हॉल पुणे येथे विधानपरिषदेची स्थापना करण्यात आली.
- 1937 च्या वेळी सदस्यसंख्या 29 होती, 1957 मध्ये ती 108 झाली तर 1960 पासुन 78 इतकी निश्चित करण्यात आली.

## भारतातील विधानपरिषद असणारे राज्य व सदस्य संख्या

| क्र. | राज्याची नावे | विधानपरिषद सदस्यसंख्या |
|---|---|---|
| 01. | तेलंगणा | 40 |
| 02. | आंध्रप्रदेश | 50 |
| 03. | ओडिशा | 49 |
| 04. | बिहार | 75 |
| 05. | कर्नाटक | 75 |
| 06. | महाराष्ट्र | 78 |
| 07. | उत्तरप्रदेश | 99/100 |

**विद्यमान विधानपरिषद -**

अध्यक्ष -

उपाध्यक्ष - नीलम गोऱ्हे

विरोध पक्षनेता - रामदास दानवे

सभागृह नेते -

- बिहार, महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तरप्रदेश, तेलंगणा या राज्यात राज्याच्या निर्मितीपासूनच विधानपरिषद अस्तित्वात आहे.
- आंध्रप्रदेशमध्ये 1957 निर्माण तर 1985 ला रद्द केली. पुन्हा 2005 मध्ये निर्माण केली. तर 2020 मध्ये मंत्रिमंडळाने रद्द करण्याचा प्रस्ताव संसदेकडे सादर केला.
- 1969 मध्ये पंजाब व प. बंगालमध्ये विधानपरिषद रद्द करण्यात आली.
- तामिळनाडूमध्ये 1986 मध्ये रद्द करण्यात आली तर 2010 मध्ये पुन्हा निर्माण झाली. 2012 मध्ये रद्द करण्यात आली.
- सध्या राजस्थान व आसाम राज्यामध्ये विधानपरिषद निर्माण करण्याची प्रक्रिया चालू आहे.
- 2019 मध्ये 36 सदस्यीय जम्मू-काश्मीरची विधानपरिषद रद्द करण्यात आली.
- 1956 च्या 7 व्या घटनादुरुस्ती अन्वये मध्यप्रदेशात विधानपरिषदेची तरतुद करण्यात आली होती मात्र तिची राष्ट्रपती मार्फत अजुनही अधिसूचना झाली नाही.
- राज्यात विधानपरिषद असावी का नसावी हे ठरविण्याचा अधिकार विधानसभेला आहे.
  पहिले सभापती - गंगाराम मच्छराम पकवासा
- विधानपरिषदेच्या सदस्यांना MLC (मेंबर ऑफ लिजलेस्टीव्ह कौन्सिल) असे म्हणतात.

## महाराष्ट्रातील विधानपरिषद अध्यक्ष १९६०-२०२३

| क्र. | सभापतीची नावे | कालावधी |
|---|---|---|
| 01. | वि.स.पांगे | 1960-1966 |
| 02. | वि.स.पांगे | 1966-1972 |
| 03. | वि.स.पांगे | 1972-1978 |
| 04. | आर.एस.गवई | 1978-1982 |
| 05. | जयवंतराव टिळक | 1982-1998 |
| 06. | ना.स. फरांदे | 1998-2004 |
| 07. | शिवाजीराव देशमुख | 2004-2015 |
| 08. | रामराजे निंबाळकर | 2015- 2022 |
| 09. | | |